# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


तात्काळ

क्रमांक:२अ/एडीएम/फी वेव्हर/२००९/९७६८
दिनांक : - 8 JUN 2009

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

**विषय :** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने जाहिर केलेल्या टयूशन फी वेव्हर योजनेत सहभागी होऊ इच्छिणा-या संस्थांची माहिती कळविण्याबाबत.......

**संदर्भ :** शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. टिईएम २००७/ (३७३/०७) तांशि-१,दिनांक २९ ऑगस्ट २००७.

उपरोक्त दिनांक २९.८.२००७ च्या शासन पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जाहीर केलेली विनाशुल्क प्रवेश योजना स्विकारल्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये आपल्या विभागाच्या अधिनस्त संस्थांपैकी ज्या संस्था सदर योजनेत भाग घेऊ इच्छित आहेत त्या संस्थांची माहिती दिनांक १२ जून , २००९ पर्यंत संचालनालयास पोहोचेल अशा बेताने पाठविण्यात यावी. म्हणजे अशा संस्थांची माहिती या वर्षाच्या प्रवेश नियमावली व माहिती पुस्तिकेत छापून प्रसिध्द करता येईल.

सदर योजनेत सहभागी होऊ इच्छिणा-या संस्थांना संदर्भाधीन शासन निर्णयातील अटींबरोबर खालील अटीही बंधनकारक आहेत हे कळविण्यात यावे.

१. योजनेत भाग घेऊ इच्छिणा-या संस्थांकडून या संचालनालयामार्फत सहमतीपत्र घेण्यात येईल व सदर संस्था योजनेत सहभागी असल्याचा उल्लेख माहितिपुस्तिकेत करण्यात येईल.
२. विनाअनुदानित संस्थांमध्ये मंजूर प्रवेशक्षमतेच्या जास्तीच्या ६ जागांवरील (over & above the sanctioned intake) प्रवेश केंद्रीभूत प्रवेशप्रक्रीयेंद्वारे करण्यात येतील. सदर जागांवर कोणतेही आरक्षण असणार नाही व त्या जागा महाराष्ट्र राज्यातील होम युनिव्हर्सिटी कोटयात अंतर्भूत केल्या जातील.
३. सर्व प्रवेश निश्चित केल्यानंतर व कट ऑफ डेटनंतर प्रवेशित उमेदवारांची अंतिम यादी तयार होईल. प्रवेशित उमेदवारांची अंतिम यादी तयार झाल्यावर लाभार्थी ठरविणे संयुक्तीक ठरेल. लाभार्थी ठरविण्यासाठी..........
   - योजनेची संस्थास्तरावर जाहिरात करण्यात येऊन गुणवत्तेनुसार व पात्रता निकषानुसार लाभार्थी ठरविण्यात यावेत.
   - लाभार्थी उमेदवारांची यादी संस्थेच्या संकेतस्थळावर व सूचनाफलकावर ठळकपणे प्रसिध्दीस देण्यात यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे
- 8 JUN 2009
आवक क्र....४६४२

D:\Rajesh\Admission 09-10\Engineering\Fee Waiver Letter to RO.doc

* सदर यादी इतर गुणवत्ता याद्यांबरोबरच छाननीसाठी विभागीय कार्यालये, संचालनालय व प्रवेश नियंत्रण समिती यांना सादर करावी.

४. प्रवेशानंतर खालील स्थिती उद्‌भवू शकेल, त्यामुळे निम्नलिखित कोष्टकानुसार लाभार्थींची संख्या ठरविण्यात यावी.

| प्रवेशित उमेदवारांची संख्या | लाभार्थी संख्या | ६० प्रवेश क्षमतेसाठी वर्गवारी | | |
|---|---|---|---|---|
| | | EWS | Ladies | P4 |
| ६६ | ६ | ३ | २ | १ |
| ६५ | ५ | २ | २ | १ |
| ६४ | ४ | २ | १ | १ |
| ६३ | ३ | १ | १ | १ |
| ६२ | २ | १ | १ | ० |
| ६१ | १ | १ | ० | ० |

५. तसेच लाभार्थींची संख्या (३+२+१) उ ६ अशी प्रवर्गनिहाय पुरेशी नसल्यास इतर प्रवर्गातील लाभार्थींची एकत्रित गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमे फायदा देण्यात यावा. याबाबतची नमुना स्थिती उदाहरणादाखल पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

| | No. of desiring Candidates | | | Beneficiary | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | EWS | Girl | PH | EWS | Girl | PH |
| Ideal Case | 3 | 2 | 1 | 3 | 2 | 1 |
| Case 1 | 5 | 1 | 1 | Top 4 | 1 | 1 |
| Case 2 | 2 | 3 | 2 | 2 | 2+ 1 if Girl is of higher merit than PH | 1+1 if PH is of higher merit than Girl |
| Case 3 | 5 | 3 | 0 | 3+ 1 if EWS is of higher merit than Girl | 2+1 if Girl is of higher merit than EWS | 0 |

६. सदर जागांसाठी वेगळा Seat ID/Tag ठेवण्यात येईल व सदर Option भरणा-या उमेदवारांनाच प्रवेश फेरीतूनच प्रवेश देण्यात येईल. सदर उमेदवारांना प्रवेश बदल/प्रवेश रद्द करण्याची मुभा असणार नाही.

(डॉ. एस. के. महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

जा.क्र.विकापु/विवि/फी वेव्हर/ ४४०२ दिनांक : - 8 JUN 2009

प्रत : या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व पदवी / पदविका संस्थांना कळविण्यात येते की, ज्या संस्थां फी वेव्हर योजनेत सहभागी होऊ इच्छित आहेत अशा संस्थांनी आपला अर्ज दोन प्रतीत या कार्यालयास दिनांक ११/०६/२००९ पूर्वी सादर करावा.

(गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत श्री. एस. बी. शिन्दे, प्रोग्रॅमर यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे